[CNR No. MHSCA2-002096-2022]

## लघुवाद न्यायालय, मुंबई यांचे न्यायालय

**पिठासीन अधिकारी - श्रीमती. जुई दा. हुशंगाबादे**
न्यायाधीश,
न्यायालय कक्ष क्र.२१
दिनांक : १४.०७.२०२३
निशाणी क्र. ८

**संक्षिप्त दावा क्र. २०९/२०२२**
वादी तर्फे श्रीमती पि. एच. गोस्वामी
प्रतिवादी विरुध्द दावा एकतर्फी

## सुप्रीम बॅंकर्स वि. बलदेव सोमा सोळंकी

**न्यायनिर्णय :-**

१. हा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द रक्कम रुपये १०,०००/- वसूलीसाठी दाखल केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादीने वादीकडून रुपये १०,०००/- कर्ज म्हणून घेतले होते. प्रतिवादीने त्याकरिता वचनचिठ्ठी करुन दिलेली होती. वादीने प्रतिवादीकडे वारंवार सदरच्या रक्कमेची मागणी केली होती. तसेच पत्र पाठविले होते. परंतु प्रतिवादीने पैसे दिले नाहीत म्हणून रक्कम रुपये १०,०००/- व सदरच्या रक्कमेवर दावा दाखल केल्याच्या तारखेपासून प्रत्यक्ष रक्कम वसूल होईपर्यंत द.सा.द.शे. ६ टक्के दराने व्याजाची मागणी केलेली आहे व हा दावा दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीला या दाव्याचे समन्स मिळूनही तो हजर झालेला नाही, त्यामुळे त्याच्याविरूध्द हा दावा एकतर्फा चालविण्यात आला आहे.

३. मी वादीतर्फे दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे विशेषता निशाणी क्र.७ सोबत दाखल केलेल्या दिनांक १६.०८.२०२१ रोजीच्या वचनचिठ्ठीचे व वादीने प्रतिवादीला पाठविलेल्या पत्राचे अवलोकन

केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीने वादीकडून रक्कम रूपये १०,०००/- कर्ज म्हणून घेतलेले होते. प्रतिवादी या प्रकरणामध्ये हजर झालेला नाही. यावरून असे दिसून येते की, त्याने वादीच्या दाव्यामधील कथने अप्रत्यक्षपणे मान्य केलेली आहेत. त्यामुळे वादी प्रतिवादीकडून रक्कम रूपये १०,०००/- व दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३४ प्रमाणे मूळ रक्कमेवर द.सा.द.शे. ६ टक्के दराने व्याज मिळण्यास पात्र आहे असे मला वाटते.

सबब, न्यायाच्या दृष्टीने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :-

**: आ दे श :**

१. दावा खर्चासह मंजूर करण्यात येत आहे

२. प्रतिवादीला असा आदेश देण्यात येतो की, त्याने वादीला तात्काळ रक्कम रूपये १०,०००/- व या रक्कमेवर दावा दाखल तारखेपासून ते प्रत्यक्ष रक्कम वसूल होईपर्यत द.सा.द.शे. रु.६ टक्के दराने व्याज दयावे.

३. वादीस २/३ कोर्ट फी परत करावी.

४. येणेप्रमाणे हुकुमनामा करण्यात यावा.

JUEE DADARAO HUSHANGABADE

Digitally signed by JUEE DADARAO HUSHANGABADE
Date: 2023.08.29 15:31:04 +0530

मुंबई
दिनांक - १४.०७.२०२३

(जुई दादाराव हुशंगाबादे)
न्यायाधीश
लघुवाद न्यायालय कक्ष क्र.२१,
मुंबई.